Volume-7 (2026)
Special Issue-3 (Sept)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# सामाजिक शास्त्रे आणि कला शास्त्रा मधील गृहअर्थशास्त्रीय बहुआयामी दृष्टिकोन

**डॉ. प्रभा चिंचखेडे**
सहयोगी प्राध्यापक गृहअर्थशास्त्र विभाग,
सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर
Email :
prabhachinchkhede5@gmail.com

Crossref DOI -

---

***सारांश :***

*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 या धोरणाअंतर्गत आजच्या या पुरातन शैक्षणिक पद्धतीमध्ये विविध शाखांना एकत्रित आणल्यामुळे विद्यार्थ्यांकरीता नवीन दालने उपलब्ध झाली आहेत. सर्व विषयांच्या बहुआयामी दृष्टिकोनामुळे समाजाला आणि विद्यार्थ्यांना भरपूर फायदा होणार आहे. कला सामाजिक शास्त्र आणि गृह अर्थशास्त्र यांचा संबंध आणि दृष्टिकोन फार व्यापक आहे. पूर्वनिर्धारित विषयापलीकडे जाण्याचे मार्ग मोकळे झाले आहे आणि अभ्यासक्रम निवडण्यामध्ये लवचिकता आलेली आहे. ज्यामध्ये विद्यार्थी एकाच शाखेत गुरफटून राहण्यापेक्षा आपल्या आवडीला प्राधान्य देत दुसऱ्या शाखेचा देखील विषय निवडू शकतो VSC, SEC , IKS यासारख्या कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना आपली परंपरा संस्कृती आणि जुना ज्ञानाचा खजिना आज विद्यार्थ्यांना उपलब्ध झालेला आहे. रोजगार निर्माण करण्याचे कौशल्य विकसित करणारी ही नवीन शिक्षण पद्धती आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यास मदत होते. मानवी जीवन समाज आणि संस्कृती समजून घेण्याचा एक आधुनिक आणि सर्व समावेशक मार्ग कोणत्याही एका विषयाचा अभ्यास करून मिळणार नाही असे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आहे.*

---

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे भारताच्या शैक्षणिक व्यवस्थेत अमुलाग्र बदल घडवून आणणारे धोरण आहे सामाजिक शास्त्र कला शाखा आणि गृह अर्थशास्त्र या विषयाच्या संदर्भात या धोरणाने अनेक नवीन शक्यता आणि आधुनिक दृष्टिकोन निर्माण केले आहेत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मुळे उघडलेली नवीन क्षितीज खालील प्रमाणे आहेत

1. पूर्वनिर्धारित विषयांपलीकडे जाण्याचे मार्ग मोकळे आणि अभ्यासक्रम निवडण्यामध्ये लवचिकता ज्यामध्ये विद्यार्थी एकाच शाखेत गुरफटून राहण्यापेक्षा आपल्या आवडीला प्राधान्य देत दुसऱ्या शाखेचाही विषय निवडू शकतो.

2. NEP 2020 च्या धोरणानुसार पुस्तकी ज्ञानापेक्षा कौशल्यांवर अधिक भर दिलेला आहे ज्यामुळे
3. विद्यार्थ्यांना नवनवीन कौशल्य शिकायला मिळतात उदाहरणार्थ गृह अर्थशास्त्रातील अन्न आणि पोषण किंवा फॅशन डिझायनिंग या विषयांना आता थेट व्यावसायिक कौशल्याचा दर्जा मिळाला आहे सामाजिक शास्त्रातील विद्यार्थ्यांना सामाजिक संशोधन किंवा माहिती विश्लेषण हे प्रात्यक्षिकांच्या स्वरूपात शिकायला मिळतात त्यामुळे पदवी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी केवळ नोकरी शोधणारा न राहता स्वतःचा उद्योग सुरू करणारा बनू शकतो.
4. या धोरणाअंतर्गत भारतीय ज्ञान प्रणालीचा समावेश असल्यामुळे भारताच्या पारंपारिक ज्ञान कला आणि संस्कृती भारतातील प्राचीन शाश्वत जीवन पद्धती जलव्यवस्थापन आणि सामाजिक रचनेचा अभ्यास केला जातो पारंपारिक भारतीय आहारशास्त्र आजीबाईचा बटवा पारंपारिक औषधे या वैज्ञानिक बाबींचा प्रामुख्याने समावेश केला आहे.
5. NEP 2020 मुळे पदवी शिक्षणात चार वर्षाचा पर्याय उपलब्ध झाला आहे ज्यामध्ये शेवटचे वर्ष पूर्णपणे संशोधनासाठी दिलेले आहे त्यामुळे आता समाजशास्त्र आणि गृह अर्थशास्त्राचे विद्यार्थी एकत्रितपणे सामाजिक समस्यांवर संशोधन करू शकतात उदाहरणार्थ ग्रामीण भागातील महिलांच्या आरोग्यावर तिथल्या सामाजिक रूढी परंपरांचा होणारा परिणाम आणि त्यावरील उपाययोजना शिफारशी अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या कल्पना याद्वारे शोधनिबंध निर्माण होऊन समाजात नवीन संशोधने निर्माण होतील.
6. पूर्वीच्या शैक्षणिक पद्धतीमध्ये 12 वी नंतर पदवी अभ्यासक्रम स्वीकारल्यानंतर काही आर्थिक आणि किंवा कौटुंबिक कारणास्तव शिक्षण सोडावे लागले तर त्यांचे शिक्षण वाया जाणार नाही त्यांना जर प्रथम वर्ष पूर्ण केले तर प्रमाणपत्र आणि दोन वर्षे पूर्ण केले तर डिप्लोमा मिळेल अशी व्यवस्था केलेली आहे तसेच जर कालांतराने पुन्हा तिसऱ्या वर्षात प्रवेश करून आपले शिक्षण विद्यार्थी पूर्ण करू शकतात

अशाप्रकारे NEP 2020 सामाजिक शास्त्र कला आणि गृह अर्थशास्त्र या विषयांकडे दुय्यम दृष्टीकोन बदलण्यास मदत झालेली आहे त्यामुळे शिक्षण हे केवळ सैद्धांतिक राहिले नसून ते मानवी जीवन आरोग्य सुधारणारे आणि रोजगार निर्माण करण्याचे कौशल्य विकसित करणारी ही नवीन शिक्षण पद्धती झालेली आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होण्यास मदत होते मानवी जीवन समाज आणि संस्कृती समजून घेण्याचा एक आधुनिक आणि सर्वसमावेशक मार्ग कोणत्याही एका विषयाचा अभ्यास करून मिळणार नाही त्याकरिता विभिन्न शाखा विभिन्न विषय एकत्रित अभ्यास करणे ही आज काळाची गरज आहे त्यामुळे एखाद्या सामाजिक समस्येचे केवळ आकडेवारीच्या पातळीवर नव्हे तर मानवी आणि भावनिक पातळीवरही अभ्यास केला जातो या काळातील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती इतिहास समजून घेण्यासाठी केवळ तारखा आणि युद्ध एवढेच लक्षात ठेवण्यापेक्षा त्या काळातील वास्तुकला लोकसंगीत हे समजून घेण्याच्याच उद्देशाने आय के एस या विषयाद्वारे विद्यार्थ्यांना प्राचीन परंपरा संस्कृती विषय याविषयीचे ज्ञान देण्याची व्यवस्था या nep मध्ये करण्यात आलेली आहे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याकरिता त्यांना विविध विषयांच्या माध्यमातून आणि महाविद्यालयीन स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते तसेच समाजातील विविध समस्या किंवा समाजात जागृती निर्माण करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करण्यासाठी सीईपी या

विषयाचा समावेश या नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत केलेला आहे आजच्या या तांत्रिक अत्याधुनिक युगात केवळ तंत्रज्ञानाचा उपयोग महत्त्वाचा किंवा सर्व समस्यांचे निराकरण करण्याकरिता योग्य आहे असे नाही तर मनुष्याच्या अंगी असणाऱ्या कला व समाजशास्त्र या दोघांची उत्तम जाण होण्याकरिताच विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची उत्सुकता निर्माण करण्याकरिता विविध शाखांद्वारे अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

अशाप्रकारे सामाजिक शास्त्र आणि कला शाखा यांचा बहुआयामी दृष्टिकोन मानवी समाज आणि संस्कृती व वर्तनाचा सर्व समावेशक अभ्यास करण्यासाठी विविध शाखांचे ज्ञान एकत्र करीत आहे त्यामुळे कोणत्याही समस्येकडे एकाच दृष्टिकोनातून न पाहता ऐतिहासिक तारकीक भावनिक आणि सामाजिक अंगाने विचार करण्याकरिता प्रोत्साहित करणारा आहे.

**बहुआयामी दृष्टिकोनाचे महत्त्व :**

a. सर्वसमावेशक दृष्टिकोनातून मानवी जीवन आणि समस्या समजून घेण्यासाठी समाजशास्त्र इतिहास राज्यशास्त्र आणि साहित्यांची सांगड घातली जाते.
b. कला आणि साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांची भावनिक बाजू आणि मानवी वेदना समजतात.
c. विद्यार्थ्यांमध्ये विविध सामाजिक घटनांमागील कारण मीमांसा शोधण्याची आणि त्यावर त्रयस्थपणे विचार करण्याची क्षमता विकसित होते.
d. दारिद्र्य पर्यावरण लिंगभाव समानता किंवा सांस्कृतिक संघर्ष यासारख्या प्रश्नांवर एकाच विषयाच्या मर्यादेबाहेर जाऊन उपाय शोधता येतात.

**प्रमुख शाखांचा परस्पर संबंध :**

- **समाजशास्त्र आणि इतिहास :** समाजाची रचना समजण्यासाठी भूतकाळातील घटनांचा आणि बदलांचा संदर्भ घेतला जातो.
- **कला आणि मानसशास्त्र :** कलाकृती नाटक किंवा साहित्यातून मानवी मन भावना आणि वर्तनाचा वेध घेतला जातो.
- **राज्यशास्त्र आणि तत्त्वज्ञान :** राजकीय धोरणे आणि कायदे तयार करताना नैतिक मूल्य आणि तत्त्वज्ञानाचा आधार घेतला जातो.
- **समाजशास्त्र आणि गृहअर्थशास्त्र :** समाजशास्त्र व्यापक पातळीवर मानवी समाज आणि सामाजिक वर्तनाचा अभ्यास करते तर गृह अर्थशास्त्र हे समाजाचा पाया असलेल्या कुटुंब आणि गृह रचनेचा सूक्ष्म अभ्यास करते म्हणजेच समाजशास्त्र सामाजिक समस्या आणि रचनेचे सिद्धांत शिकविते तर गृह अर्थशास्त्र त्या सिद्धांतांचा वापर करून कौटुंबिक पातळीवर जीवनमान सुधारण्याचे प्रात्यक्षिक काम करते अशा प्रकारे

या दोन्ही विषयांचा एकमेकांशीवाय अभ्यास पूर्ण होऊ शकत नाही.

- **मानसशास्त्र आणि गृहअर्थशास्त्र :** या दोन शाखांमध्ये अत्यंत खोल आणि जैविक संबंध आहे मानसशास्त्र मानवी मन भावना आणि वर्तनाचा अभ्यास करते तर गृह अर्थशास्त्र कुटुंब गृह जीवन आणि व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी काम करते.

कोणतेही घर किंवा कुटुंब केवळ विटा मातीच्या भिंतींनी बनत नाही तर ते तिथल्या सदस्यांच्या मानसिक संबंधावर टिकून असते म्हणून गृह अर्थशास्त्रातील प्रत्येक टप्प्यावर मानसशास्त्राचा दृष्टिकोन वापरला जातो थोडक्यात सांगावयाचे झाल्यास गृह अर्थशास्त्र हे कुटुंबाला भौतिक आणि शारीरिक सोयी सुविधा चांगले अन्न कपडे घर पुरविण्याचे व्यवस्थापन करते तर मानसशास्त्र त्या घरात राहणाऱ्या माणसांना स्वास्थ्य आनंद आणि प्रेम मिळवून देण्याचे काम करते.

अशाप्रकारे इतिहास मानसशास्त्र तत्त्वज्ञान इत्यादी विषयांप्रमाणेच इतर अनेक विषयांच्या अभ्यासाने शालेय आणि महाविद्यालयीन अभ्यासक्रम सामाजिक शास्त्रे आणि कला शाखांच्या बहुआयामी दृष्टिकोनाचा समावेश करणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे आजचे शिक्षण केवळ पाठांतर किंवा गुण मिळविण्या पुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना एक सजग नागरिक बनविण्यावर भर देत आहे अशी ही नवीन शैक्षणिक धोरण 2020 देखील याच बहुआयामी शिक्षण पद्धतीवर आधारित आहे.

1. एकात्मिक शिक्षण यामध्ये विद्यार्थी इतिहास शिकताना त्या काळातील आर्थिक परिस्थिती म्हणजे अर्थशास्त्र आणि तिथली भौगोलिक परिस्थिती याचाच अर्थ भूगोलही एकमेकांशी जोडून शिकतात विज्ञान किंवा गणितासारखे कठीण विषय सोपे करण्यासाठी जेव्हा त्यात चित्रकला कथा किंवा नाटकाचा म्हणजेच कलेचा वापर केला तर विद्यार्थ्यांना लवकर विषय समजून येतो.
2. विद्यार्थी कोणत्याही सामाजिक समस्ये कडे एकाच दृष्टिकोनातून न पाहता त्यांचे अनेक बाजूंचे विश्लेषण करायला शिकतात केवळ पुस्तकात वाचलेले खरे न मानता स्वतःचे तारखीक विचार करून निर्णय घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होते.
3. जेव्हा विद्यार्थी कथा कादंबऱ्या किंवा कविता शिकतात तेव्हा त्यांना वेगवेगळ्या मानवी भावना वेदना आणि संस्कृती चे ज्ञान मिळते या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतर जाती धर्म लिंग आणि भाषांबद्दल आदर व सहानुभूती निर्माण होते.
4. आजच्या जगात अशा विद्यार्थ्यांची गरज आहे ज्यांना केवळ एकाच विषयाचे ज्ञान नाही तर जे अनेक क्षेत्रांमध्ये काम करू शकतात कार्पोरेट जगातील किंवा सरकारी क्षेत्रातील जटिल समस्या सोडविण्यासाठी हा बहुआयामी दृष्टिकोन खूप फायदेशीर ठरतो.
5. भारताच्या नवीन शैक्षणिक धोरणात बहुआयामी दृष्टिकोनाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे हे धोरण पारंपारिक शिक्षण पद्धतीमधील कला वाणिज्य आणि विज्ञान या शाखांमधील क** भिंती पाडून टाकते या धोरणाचा मुख्य उद्देश आयआयटी सारख्या तांत्रिक संस्थांमध्ये कला आणि मानव्यविद्या

शाखा शिकविणे आणि कला शाखेच्या विद्यार्थ्यांना विज्ञान शिक्षणाची संधी देणे हा आहे.

**वैशिष्ट्ये :**

1. शाखांची बंधने तोडून विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्या मुख्य विषयासोबतच त्यांच्या छंद यांना किंवा इतर आवडीच्या विषयांना अधिकृतपणे शिकता येते.
2. भारतात बहुआयामी शैक्षणिक आणि संशोधन विद्यापीठे स्थापन केली जात आहे या संस्थांमध्ये आयआयटी आणि आयआयएम च्या तोडीचे बहुआयामी शिक्षण आणि संशोधन केले जाईल ज्यामुळे जागतिक दर्जाचे संशोधन तयार होते.
3. नवीन धोरणानुसार पदवी शिक्षण चार वर्षाचे असेल ज्यामध्ये संशोधनावर अधिक भर दिला जाईल विद्यार्थी एका वर्षात शिक्षण सोडल्यास त्याला प्रमाणपत्र दोन वर्षांनी डिप्लोमा आणि तीन वर्षांनी पदवी मिळेल त्यांचे क्रेडिट डिजिटल लॉकर मध्ये सुरक्षित राहतील जेणेकरून ते नंतर कधीही शिक्षण पूर्ण करू शकतील.
4. विद्यार्थ्यांना शालेय स्तरापासूनच म्हणजेच इयत्ता सहावीपासून व्यावसायिक कौशल्य जसे की कोडींग सुतार काम बागकाम किंवा स्थानिक कला शिकविल्या गेल्या तर केवळ पुस्तकी ज्ञान देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव देता येतो.

अशा या फायदेशीर धोरणाचा गृह अर्थशास्त्रीय बहु आहे आम्ही दृष्टिकोन देखील तेवढाच व्यापक आहे.

1. समाजशास्त्रीय दृष्टिकोन : गृह अर्थशास्त्र हे समाजाचा सर्वात लहान आणि महत्त्वाचा घटक म्हणजे कुटुंब आणि मानवी वर्तन यांच्याशी थेट जोडलेलाआहे गृहअर्थशास्त्रात कुटुंबाची रचना नातेसंबंध आणि बालकांचा विकास यांचा अभ्यास केला जातो बदलत्या समाजाचा कुटुंबावर काय परिणाम होतो याबद्दलचा अभ्यास या नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत केल्या जाण्याची व्यवस्था केलेली आहे.
2. अर्थशास्त्रीय दृष्टिकोन : बजेट व्यवस्थापन कौटुंबिक उत्पन्न आणि खर्च यांचा ताळमेळ कसा घालावा हे हा विषय शिकवितो तसेच बाजारात ग्राहकांची होणारी फसवणूक रोखण्याकरिता ग्राहक हक्क आणि जागृती हा यातील एक प्रमुख सामाजिक आर्थिक भाग आहे.
3. मानसशास्त्रीय दृष्टिकोन : कुटुंबातील वेगवेगळ्या वयोगटातील सदस्यांची मानसिक गरज समजून घेणे त्यांच्या वर्तनाचा अभ्यास करणे आणि कौटुंबिक सुसंवाद राखणे यासाठी मानसशास्त्रीय दृष्टिकोन वापरला जातो.

अशा प्रकारे फक्त मानव्य शास्त्र या शाखेतील विषयांतर्गत अभ्यास करण्याची संधी या नवीन शैक्षणिक धोरणाद्वारे मिळालेली नाही तर इतरही विद्याशाखेतील विषयांशी बहुआयामी दृष्टिकोन देखील विकसित झाला आहे. तो खालील प्रमाणे आहे.

1. कला शाखेचा दृष्टिकोन : गृह अर्थशास्त्रामध्ये मानवी जीवनाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि दैनंदिन जीवन

सुंदर बनविण्याकरिता कलात्मकतेचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे यामध्ये उपलब्ध जागेचा योग्य वापर करून घर अधिक सुंदर प्रसन्न आणि कार्यक्षम कसे बनवावे हे आंतरिक सजावट तर कपड्यांची निवड फॅशन विणकाम आणि कपड्यांचे व्यवस्थापन यामध्ये पूर्णपणे कलात्मक दृष्टिकोन कशाप्रकारे वृद्धिंगत करावा तसेच जेवण केवळ चविष्ट असणे पुरेसे नाही तर ते आकर्षक पद्धतीने वाढणे ही सुद्धा एक मोठी कला आहे अशा सर्व बहुआयामी दृष्टिकोनाचा विकास केला जातो.

2. विज्ञान शाखेची असलेली सांगड : गृह अर्थशास्त्र विषय हा केवळ कला आणि सामाजिक शास्त्रांशी जोडलेला नाही तर याचा पाया मात्र विज्ञानावर आधारित आहे शरीराला लागणारी जीवनसत्त्वे कॅलरीज समतोल आहार आणि वेगवेगळ्या आजारांमध्ये दिला जाणारा आहार हा पूर्णपणे जैवविज्ञान आणि रसायनशास्त्राचा भाग आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, आज या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या सुप्त गुणांना ओळखण्याची व एकाच साकोरीबद्ध शिक्षण प्रणालीमध्ये अडकून राहण्यापेक्षा स्वतःची बौद्धिक पातळी ओळखून स्वतःच्या गुणांना वाव देण्याची संधी उपलब्ध करून दिलेली आहे प्रोजेक्टवरच्या सहाय्याने समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात ज्याद्वारे विद्यार्थी समाजात जाऊन समस्या जाणून घेतो आणि आपल्या परीने त्यावर उपाययोजना करणे चा प्रयत्न करतो अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीला प्रोत्साहन दिले जाते.

**निष्कर्ष :**

अशा या विविध शाखांच्या एकत्रीकरणामुळे विद्यार्थ्यांना एक मोठे दालन उपलब्ध करून दिलेले आहे ज्यामुळे त्यांच्या बौद्धिक कक्षा रुंदाविण्याची एक संधी उपलब्ध झालेली आहे याकरिता विद्यार्थ्यांना चौफेर शिक्षणाची सोय मोठी सोय उपलब्ध झालेली आहे आजच्या या नव्या शेख औद्योगिक आणि नव्या आय ए आय च्या काळातही विद्यार्थ्यांना या पुस्तकी ज्ञानाची आणि महाविद्यालयांची गरज मात्र कमी झालेली नाही फक्त डिग्री घेऊन मिळविण्यापेक्षा आपली कौशल्य विकसित करण्याची संधी आज मुलांना मिळाल्यामुळे या संधीचे सोने करतील हीच आशा आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांचे तर भले होईलच परंतु त्याचबरोबर समाजालाही उत्तम नागरिक मिळतील आणि त्या अनुषंगाने देशाच्याही विकासास हातभार निश्चितच लागेल.

**संदर्भसूची :**


- गृह अर्थशास्त्र- प्रा. डॉ. अंजली देशपांडे आणि प्रा. सुनीता राऊत
- गृह व्यवस्थापन आणि कौटुंबिक संसाधने – डॉ. आशा निमकर
- होम सायन्स - प्रेमलता मुळीक
- समाजशास्त्र आणि कौटुंबिक संस्था – डॉ. प्रदीप आगलावे
- भारतीय समाज रचना आणि समस्या - डॉ. प्रदीप आगलावे

Volume-7 (2026)
Special Issue-3 (Sept)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

- समाजशास्त्र संकल्पना आणि सिद्धांत - प्रा. ना. रा. साळुंखे
- मानसशास्त्र आणि बालविकास - डॉ. प्रज्ञा सुकळीकर आणि डॉ. अनघा पाटील
- शिक्षणाचा बहुआयामी दृष्टिकोन - डॉ. विठ्ठल घोरपडे